17 JUL 2017

महाराष्ट्र टाइम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ...तर प्रकल्पाच्या दहा टक्के दंड

## विद्यापीठातील 'रेरा' कार्यशाळेत प्राधिकरण सदस्य बी. डी. कापडनीस यांची माहिती

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

देशाच्या अर्थव्यवस्थेत आणि रोजगार निर्मितीसाठी बांधकाम इंडस्ट्रीजचा मोठा हातभार आहे. ग्राहक हित जपतानाच बांधकाम क्षेत्रात पारदर्शकता, शिस्त आणण्यासाठी रेरा कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत असून बांधकाम व्यावसायिकांनी ३१ जुलै अखेर सध्याच्या (ऑन गोईंग) व नव्या गृहप्रकल्पाची नोंदणी करणे अत्यावश्यक आहे. 'रेरा'प्राधिकरणकडे जुलैअखेर नोंदणी न झाल्यास संबंधित व्यावसायिकांना गृहप्रकल्पाच्या एकूण आराखड्याच्या दहा टक्के दंडाची आकारणी केली जाईल, असे स्थावर संपदा नियामक प्राधिकरणचे (रिअल इस्टेट रेग्युलेशन) सदस्य बी. डी. कापडनीस यांनी स्पष्ट केले.

शिवाजी विद्यापीठ कायदा विभाग, क्रिडाई कोल्हापूर आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने रेरा कायदाविषयक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. प्रकुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यशाळा झाली.

कापडनीस म्हणाले, 'रेरा कायदा हा शहरी व ग्रामीण भागासाठी लागू आहे. रेरा कायदा हा ग्राहकहिताला आणि व्यावसायिकांना मारक आहे, असे चित्र उभे करु नये. या क्षेत्रातील मनमानीला चाप बसविताना बांधकाम व्यवसायात आर्थिक शिस्त, नियोजन आणि प्रामाणिकपणा या गोष्टी रुजवायच्या आहेत. उपलब्ध माहितीनुसार राज्यातील बांधकाम व्यावसायिकांची संख्या ११ हजाराच्या आसपास आहे. अद्याप ३६५ बांधकाम व्यावसायिकांनीच रेरा प्राधिकरणकडे नोंदणी केली आहे. प्रत्येक व्यावसायिकाचा किमान एक गृहप्रकल्प अपेक्षित धरला तरी मोठ्या संख्येने नोंदणी शिल्लक आहे. उर्वरित १५ दिवसांत ऑनलाइन नोंदणी केली नाही तर गृह प्रकल्पाच्या एकूण इस्टिमेटच्या दहा टक्के रकमेची दंडात्मक कारवाई होऊ शकते.' ॲड. आनंद पटवर्धन, क्रेडाई उपाध्यक्ष विद्यानंद बेडेकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्रभारी जिल्हा मुख्य न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी, भंडाऱ्याचे जिल्हा मुख्य न्यायाधीश एस. ए. देशमुख, ग्राहक मंचच्या श्रीमती एस. पी. भोसले, क्रिडाईचे अध्यक्ष महेश यादव, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रशांत शिंदे, विद्यापीठातील लॉ विभाग प्रमुख प्रो. विनयकुमार धुपदाळे यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचे उद्घाटन झाले. विद्यापीठाचे कायदा सल्लागार डॉ. संतोष शहा यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव उमेशचंद्र मोरे यांनी स्वागत केले. ॲड. पिनाज सनदी यांनी सूत्रसंचालन केले. विद्यापीठातील कायदा अधिकारी अनुष्का कदम यांनी आभार मानले.

अर्जुन टाकळकर



रोपाला पाणी घालून 'रेरा' कायद्याविषयीच्या कार्यशाळेचे उद्घाटन करताना बी. डी. कापडनीस. सोबत उमेशचंद्र मोरे, प्रो. विनयकुमार धुळपदे, महेश यादव, न्यायाधीश एस. ए. देशमुख, ॲड. प्रशांत शिंदे, श्रीमती एस. पी. भोसले, प्र कुलगुरु डॉ. टी. शिर्के, जिल्हा मुख्य न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी, संतोष शहा आदी.

### 'रेरा'ची वैशिष्ट्ये...

- शहरी व ग्रामीण भागात कायदा लागू
- ५०० मीटरपेक्षा जास्त गृह प्रकल्पासाठी अनिवार्य
- आठ फ्लॅटपेक्षा मोठी इमारत रेराच्या कक्षेत
- रिअल इस्टेट ॲथोरिटीकडे ऑनलाइन नोंदणी आवश्यक
- नवीन प्रकल्पाच्या ऑनलाइन नोंदीसाठी ७५० रु.
- अल्प खर्चात संपूर्ण गृहप्रकल्पाची माहिती नोंद
- फसवणूक झाल्यास प्राधिकरणकडे ऑनलाइन तक्रारी
- साठ दिवसात तक्रारींचे निवारण
- मुदतीत प्रकल्प पूर्ण न झाल्यास नुकसान भरपाई
- भविष्यात फ्लॅटच्या किंमती कमी होतील

**"रेरा कायदा सर्वांसाठी उपयुक्त आहे. या कायद्यामुळे खरेदी विक्रीत पारदर्शकपणा येणार आहे. ग्राहकांकडून आकारण्यात येणारी फ्लॅटच्या बुकिंगमधील ७० टक्के रक्कम स्वतंत्र खात्यात ठेवायचे आहे. एकीकडे हा ग्राहकहिताचा निर्णय आहे तर दुसरीकडे बांधकांम व्यावसायिकांच्या हाती कमी पैसे उपलब्ध होणार असल्याने त्यांची आर्थिक गैरसोय होऊ शकते. कायद्यामध्ये पार्किंग आकारणीविषयी संदिग्धता आहे. रेरा कायद्याची अंमलबजावणी करताना बांधकाम व्यावसायिकांना अधिक कष्ट घ्यावे लागणार आहेत. त्याचा परिणाम व्यवसायावर होऊ शकतो.**

**ॲड. अभय नेवगी**

### शिक्षा अटळ...

कापडनीस म्हणाले, 'देशाच्या आर्थिक विकासात बांधकाम व्यवसायाचा वाटा मोठा आहे. देशाच्या लोकसंख्येत दरवर्षी १.३ टक्क्यांनी वाढ होत आहे. नागरिकीकरण, स्थलांतरण आणि लोकसंख्या वाढीचा विचार करता देशभरात दरवर्षी दहा लाख घरांच्या बांधणीची गरज आहे. यावरुन या क्षेत्राची उपयुक्तता आणि आवाका स्पष्ट होतो. रेरा प्राधिकरण गृहनिर्मितीला चालना, सरकारला सल्ला आणि कायद्याची अंमलबजावणीसाठी काम करणार आहे. रेरा कायद्याची अंमलबजावणी बांधकाम व्यावसायिकांना त्रास देणे हा उद्देश नाही. त्यासाठी प्राधिकरण दंडुका घेऊन बसलेली नाही. मात्र जाणूनबुजून कुणी चुका केल्या, फसवणुकीचा प्रकार आढळला त्याला शिक्षा होईलच.

### कोल्हापुरात सेंटर

'रेरा'प्राधिकरणाच्या सध्या मुंबई, नागपूर, पुणे येथे सेंटर आहेत. कोल्हापुरात तक्रारीचे प्रमाण वाढल्यास येथेही सेंटर सुरू करावे लागेल, असेही कापडनीस म्हणाले.

### 'रेरा' कुणाला लागू नाही....

स्वत:साठी इमारत बांधकाम असेल तर नोंदणीची गरज नाही
जुन्या इमारतीच्या दुरुस्तीचे काम असल्यास (मालक किंवा सोसायटी) भाड्याने द्यावयाच्या इमारती, तसेच विक्री न करावयाच्या इमारतींना रेरा कायद्यातून सुट देण्यात आली आहे.

एकमेव निष्पक्ष वृत्तपत्र
महाराष्ट्र टाइम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2017
पुढारी

# 'रेरा' ग्राहक, बिल्डर्स यांचे हित साधणारा

## बी. डी. कापडणीस; विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशाची लोकसंख्या वाढत असून दरवर्षी दहा लाख नव्या घरांची आवश्यकता भासत आहे. बांधकाम व्यवसायात परदेशातील भांडवलदार गुंतवणूक करण्याची शक्यता आहे. स्पर्धेत टिकण्यासाठी बांधकाम व्यावसायिकांनी ग्राहकांना उच्च दर्जा, गुणवत्तापूर्ण व वेळेत घरे दिली तर 'रेरा' हे संकट नसून विकासाची नवी संधी आहे. या कायद्यामुळे ग्राहक व बिल्डर्स दोघांचे हित साधणार आहे, असे प्रतिपादन रियल इस्टेट रेग्युलेशन अथॉरिटी (रेरा) मुंबईचे सदस्य बी.डी. कापडणीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ लॉ विभाग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व 'क्रेडाई' यांच्या संयुक्त विद्यमाने 'रियल इस्टेट (रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट-) अॅक्ट -२०१६ (रेरा)' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. याप्रसंगी कापडणीस यांनी 'रेरा' कायद्याची संपूर्ण माहिती दिली. ते म्हणाले, 'रेरा' कायद्यामुळे कोणाचा फायदा होणार याबाबत समाजात संभ्रम आहेत. दरवर्षी १.३ टक्के लोकसंख्या वाढते. सर्वसामान्य माणसाला परवडणारी घरे उपलब्ध झाली पाहिजेत. घर विकत घेताना सर्वसामान्यांची फसगत होण्याचे प्रकार देशात वाढले होते. या प्रकारांवर अंकुश ठेवण्यासाठी २०१६ साली रेरा कायदा संसदेत समंत झाला. त्याची राज्यात १ मे २०१७ पासून अंमलबजावणी सुरू झाली. ५०० चौरस मीटरपेक्षा जास्त शेतजमीन व आठ पेक्षा जास्त सदनिका असलेल्या इमारतीसाठी 'रेरा' लागू आहे. जुनी इमारत, आठ पेक्षा जास्त सदनिका असलेली इमारत विकायची नाही व इमारत भाड्याने देण्याची असल्यास त्यांना हा कायदा लागू नाही.

'रेरा'मधील तरतुदीनुसार रियल इस्टेट ॲथॉरिटीकडे ऑनलाईन नावनोंदणी करण्याबरोबरच सर्व प्रकारची माहिती ग्राहकांना देणे गरजेचे असल्याने ग्राहकांना बिल्डरची क्षमता कळणार आहे. प्रकल्पाची जाहिरात करण्यासाठी बिल्डर्सना पैसे खर्च करावे लागणार नाहीत. बिल्डर्सना बुक केलेल्या फ्लॅटची ७० टक्के रक्कम बँकेत भरावी लागणार आहे. जमिनीच्या किमतीप्रमाणे टप्प्या-टप्प्याने याचा बांधकामासाठी खर्च करावा लागणार आहे. यासाठी साईट इंजिनिअर, चार्टर्ड अकौंटंट, आर्किटेक्ट यांचे प्रमाणपत्र घ्यावे लागणार आहे. वेळेत मुदतीत प्रकल्प पूर्ण न केल्यास ग्राहकांना

17 JUL 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ लॉ विभाग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व 'क्रेडाई' यांच्या संयुक्त विद्यमाने 'रेरा' विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेचे रोपट्याला पाणी घालून उद्घाटन करताना रियल इस्टेट रेग्युलेशन ॲथॉरिटी (रेरा) मुंबईचे सदस्य बी. डी. कापडणीस. शेजारी उपस्थित न्या. एस.पी.कुलकर्णी, न्या. एस.ए.देशमुख, न्या. उमेशचंद्र मोरे, एस. पी. भोसले, प्रभारी प्र.कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ॲड. संतोष शहा, डॉ. व्ही.एन.धुपदळे, महेश यादव आदी. (छाया : नाज ट्रेनर)

व्याजासह मोबदला द्यावा लागणार आहे. वेळेत प्रकल्प पूर्ण केल्यास नफा वाढून बाजारात विश्वासार्हता निर्माण होईल. छोटे-मोठे बिल्डर्स या कायद्यामुळे बाहेर जाणार नसून उलट त्यांचा फायदाच होणार आहे. कमी खर्चात घरांच्या निर्मितीचा प्रयत्न करणे, शासनाला सल्ला देणे व सगळ्यांकडून रेग्युलेशन तरतुदी पार पाडून घेणे हे 'रेरा'चे काम आहे. सर्व परवानग्या घेण्यासाठी 'वन विंडो'ची प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने ॲथॉरिटीचे प्रयत्न सुरू असल्याचे कापडणीस म्हणाले.

पुणे येथील ॲड. अभय नेवगी म्हणाले, अनेक बारीक-सारीक गोष्टींचा विचार करून त्यांचा अंतर्भाव 'रेरा' कायद्यात करण्यात आला आहे. हा कायदा बनण्यासाठी त्याला अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागला आहे. सध्या मात्र या कायद्याचे सकारात्मक परिणाम दिसत आहेत. कायद्यामध्ये बांधकाम व्यावसायिकाची जबाबदारी आणि कर्तव्य ही नमूद करण्यात आली आहेत. बांधकाम व्यावसायिक आणि ग्राहकांचे हित लक्षात घेऊन हा कायदा तयार करण्यात आला आहे. मुंबईतील ॲड. आनंद पटवर्धन म्हणाले, 'रेरा' कायदा म्हणजे लहान रोपटे आहे. या कायद्याची अंमलबजावणी जशी होईल तशी त्यातील ही दोष समोर येतील. पुढील काळात त्यावरही उपाय योजना करण्यात येतील.

सकाळी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या.उमेशचंद्र मोरे यांनी स्वागत केले. ॲड. संतोष शहा यांनी विषयाबद्दलची माहिती दिली. यावेळी कोल्हापूरचे प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी म्हणाले, कायदा समाज बदलाचे अस्त्र आहे. कायदा निर्मितीमागील हेतू महत्त्वाचा असतो. देशात खूप चांगले कायदे आहेत. ग्राहक व बिल्डर्स यांच्यात सुसंवाद घडविण्यासाठी 'रेरा' हा कायदा अस्तित्वात आला आहे. भंडाऱ्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. ए. देशमुख म्हणाले, हा कायदा सामाजिक गरज म्हणून पुढे आला आहे. नागरिकांचे हित यामुळे होणार आहे. यावेळी 'क्रेडाई'चे आदित्य बेडेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी निवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश के. डी. पाटील, जिल्हा ग्राहक मंचच्या अध्यक्षा एस. पी. भोसले, क्रेडाईचे अध्यक्ष महेश यादव, कोल्हापूर बार असोसिएशनचे ॲड. प्रशांत शिंदे, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, विद्यापीठ कायदा विभाग प्रमुख व्ही. एन. धुपदळे आदी उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठ कायदा अधिकारी अनुष्का कदम यांनी आभार मानले.

17 JUL 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बांधकाम व्यावसायिकांनी रेराकडे संधी म्हणून पाहावे

## - बी. डी. कापडणीस



कोल्हापूर : क्रिडाई, शिवाजी विद्यापीठ कायदा विभाग आणि डिस्ट्रिक्ट लीगल सर्व्हिस ॲथॉरिटी यांच्या वतीने आयोजित चर्चासत्राचे उद्घाटन करताना बी. डी. कापडनीस. सोबत इतर मान्यवर. (छाया : पांडुरंग पाटील)

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

देशाची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे प्रतिवर्षी १० लाख नव्या घरांची आवश्यकता आहे. बांधकाम व्यवसायात परदेशातील भांडवलदार गुंतवणूक करण्याची शक्यता असल्याने स्पर्धेत टिकण्यासाठी बांधकाम व्यावसायिकांनी ग्राहकांना उच्च दर्जा, गुणवत्तापूर्ण व वेळेत घरे दिली तर 'रेरा' हे संकट नसून विकासाची संधी असेल, असे मत रियल इस्टेट रेग्युलेटरी ॲथॉरिटीचे सदस्य बी. डी. कापडणीस यांनी रविवारी व्यक्त केले. क्रिडाई, शिवाजी विद्यापीठ कायदा विभाग व डिस्ट्रिक्ट लीगल सर्व्हिस ॲथॉरिटी यांच्या वतीने शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

कापडणीस म्हणाले, घर विकत घेताना सर्वसामान्यांची फसगत होण्याचे प्रकार वाढले होते. या प्रकारांवर अंकुश ठेवण्यासाठी २०१६ साली रेरा कायदा संसदेत संमत करावा लागला. त्याची अंमलबजावणी १ मेपासून केली गेली. ५०० चौरस मीटरपेक्षा जास्त जागेचा विकास करावयाचा आहे, ८ पेक्षा अधिक सदनिका बांधून विकायच्या आहेत, अशांना हा कायदा लागू होतो. ग्राहकाने खरेदी केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी फ्लॅट किंवा घर देणे यासह कारपेट, बिल्टअप, सुपर बिल्टअप अशी क्षेत्रांची नावे घेऊन ग्राहकांची फसगत करणे आदी बाबींना 'रेरा'मुळे पायबंद बसेल. त्यानुसार बांधकाम व्यावसायिकांना 'रेरा'मध्ये नोंदणी करणे सक्तीचे आहे. यात व्यावसायिकांनी नोंदणी केल्यानंतर त्यांच्या मागील पाच वर्षांत त्यांच्या नवनिर्मिती ग्राहकांना कळणार आहेत. याशिवाय ती वेळेत पूर्ण केली का? त्यात कोणती तंत्रे, कौशल्ये, साहित्य कोणत्या प्रकारचे, आदी बाबींचा तपशील असेल. त्यातून ग्राहकाला खरा तपशील समजेल. शिवाय व्यावसायिकांची देशभरात संकेतस्थळावरून जाहिरातही होणार आहे.

चर्चासत्राच्या दुसऱ्या सत्रात वकील अभय नेवगी म्हणाले, अनेक बारीकसारीक गोष्टींचा विचार करून त्यांचा अंतर्भाव रेरा कायद्यात केला आहे. एखादा कायदा बनवताना त्याला अनेक प्रक्रियांतून जावे लागत असल्याने तो कायदा परिपूर्ण असाच बनतो. रेरा कायदा एक दिवसात आलेला नाही. हा कायदा बनण्यासाठी त्याला अनेक अडथळ्यांना सामना करावा लागला आहे. कायद्यात बांधकाम व्यावसायिकांची जबाबदारी व कर्तव्ये नमूद केली आहेत. बांधकाम व्यावसायिक आणि ग्राहकांचे हित लक्षात घेऊनच हा कायदा तयार केला आहे. ॲड. आनंद पटवर्धन म्हणाले, रेरा कायदा म्हणजे लहान रोपटे आहे. या कायद्याची अंमलबजावणी जशी होईल, तसे त्यातीलही दोष समोर येतील. पुढे त्यावरही उपाययोजना करण्यात येतील. यावेळी जिल्हा सत्र न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी, भंडारा जिल्ह्याचे मुख्य न्यायाधीश एस. ए. देशमुख, जिल्हा ग्राहक मंचच्या अध्यक्षा एस. पी. भोसले, विधी सेवा प्राधिकरणचे सचिव उमेशचंद्र मोरे, क्रिडाईचे अध्यक्ष महेश यादव, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नादंवडेकर, विद्यापीठ कायदा विभागप्रमुख व्ही. एन. धुळपदे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. आभार शिवाजी विद्यापीठ कायदा अधिकारी अनुष्का कदम यांनी मानले.

1-7 JUL 2017

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रेरा' संकट नसून विकासाची संधी

## बी. डी. कापडणीस यांचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील चर्चासत्रात मार्गदर्शन

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशाची लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने प्रतीवर्षी १० लाख नवीन घरांची आवश्यकता आहे. बांधकाम व्यवसायात परदेशातील भांडवलदार गुंतवणूक करण्याची शक्यता आहे. त्यामुळे या स्पर्धेत टिकण्यासाठी बांधकाम व्यावसायिकांनी ग्राहकांना उच्च दर्जा, गुणवत्तापूर्ण व वेळेत घरे दिली तर 'रेरा' हे संकट नसून विकासाची संधी ठरणार असल्याचे मत रियल इस्टेट रेग्युलेटरी ॲथोरीटीचे सदस्य बी. डी. कापडनीस यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ विधी विभाग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व क्रीडाई कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारतीमधील आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. बी. डी. कापडनीस म्हणाले, घर विकत घेताना सर्वसामान्यांची फसगत होण्याचे प्रकार देशात वाढले होते. या प्रकारांवर अंकुश ठेवण्यासाठी २०१६ मध्ये रेरा कायदा संसदेत समंत करावा लागला. त्याची अंमलबजावणी १ मे २०१७ पासून केली गेली. या कायद्यामध्ये ५०० चौरस मीटरपेक्षा जास्त जागेचा विकास करावयाचा असल्यास तसेच आठपेक्षा अधिक सदनिका बांधून विक्री करावयाच्या असल्यास हा कायदा लागू होतो. सर्वसामान्य माणसांची गरज लक्षात घेता निवारा महत्त्वाचा असतो. त्यानुसार ग्राहकाने खरेदी केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी फ्लॅट किंवा घर देणे, यासह कार्पेट, बिल्टअप, सुपर बिल्टअप अशा क्षेत्रांची नावे घेऊन ग्राहकांची फसगत करणे आदी बाबींना 'रेरा'मुळे पायबंद बसणार आहे. त्यानुसार बांधकाम व्यावसायिकांना 'रेरा'मध्ये नोंदणी करणे सक्तीचे आहे. यात व्यावसायिकांनी नोंदणी केल्यानंतर त्यांच्या मागील पाच वर्षात त्यांच्या नवनिर्मिती ग्राहकांना कळणार आहेत. याशिवाय ती वेळेत पूर्ण केली का, त्यात कोणती तंत्रे, कौशल्य, साहित्य कोणत्या प्रकारचे आहे आदी बाबींचा तपशील असेल. त्यातून ग्राहकाला खरा तपशील समजणार आहे. याशिवाय व्यावसायिकांची विनासायास देशभरात संकेतस्थळावरून संबंधित माहीती मिळणार आहे.



कोल्हापूर : चर्चासत्रात मार्गदर्शन करताना बी. डी. कापडणीस.

दुसऱ्या सत्रात ॲड. अभय नेवगी यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, रेरा कायदा अनेक बाबतीत स्वयंपूर्ण आहे. अनेक बारीक सारीक गोष्टीचा विचार करून त्यांचा अंतर्भाव कायद्यात करण्यात आला आहे. एखादा कायदा बनविताना त्याला अनेक प्रक्रियेतून जावे लागत असल्याने तो कायदा परीपूर्ण असाच बनतो. 'रेरा' हा कायदा एका दिवसात आलेला नाही. त्यासाठी अनेक अडथळ्यांना सामना करावा लागला आहे. सध्या मात्र या कायद्याचे सकारात्मक परिणाम दिसत आहेत. बांधकाम व्यावसायिक आणि ग्राहकांचे हित लक्षात घेऊन हा कायदा तयार करण्यात आला आहे. ॲड. आनंद पटवर्धन म्हणाले, रेरा कायदा म्हणजे लहान रोपटे आहे. या कायद्याची अंमलबजावणी होत जाईल तसे यातील दोष समोर येतील. भविष्यात त्यावरही उपाय योजना करण्यात येतील.

यावेळी भंडारा जिल्ह्याचे मुख्य जिल्हा सत्र न्यायाधीश एस. ए. देशमुख, जिल्हा सत्र न्यायाधीक्ष एस. पी. कुलकर्णी, न्यायमूर्ती, जिल्हा ग्राहक मंचचे अध्यक्ष एस. पी. भोसले, विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. उमेशचंद्र मोरे, क्रिडाईचे अध्यक्ष महेश यादव, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2017

Times of India

# Not registered with RERA? Pay 10% of project cost as fine

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Builders failing to register any ongoing residential project before July 31 will have to face a fine of 10% of the cost of the project.

This was announced by B D Kapadnis, one of the three members of the Real Estate Regulatory Authority (RERA), during a workshop conducted for various stakeholders of the Act on Sunday. The event was organised by the Kolhapur unit of Credai and Shivaji University.

Kapadnis and senior advocate Abhay Nevagi guided them on various aspects of the new act, which came into effect two and half months ago.

As per the act, all ongoing projects should be registered with Maha-RERA online. Kapadnis said, "The real estate sector has contributed hugely in the country's economy. The act ensures transparency and welfare of the buyers. The act mandates discipline in the sector. We have decided to impose a fine of 10% of the project cost on the builders if they fail to register it with RERA."

The act applies to both, urban and rural parts. "The government claims that the act will stop generation of black money in the sector. As per data, there are 11,000 developers in the state. As of now, 365 have registered. We expect more registration in the next 15 days," said Kapadnis.

RERA has offices in Mumbai, Nagpur and Pune with former state government official Gautam Chaterjee as chairman.

Nevagi said, "The developers have to take additional efforts to ensure transparency in the sector. There is still dilemma over parking and other building developments, which we hope to resolve in the coming days."

१७ JUL २०१७ तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे 'जीएसटी'वर आज खुले चर्चासत्र

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स व कोल्हापूर इन्व्हेस्टर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार (१७) रोजी शाहू स्मारक भवन येथे सायंकाळी ४.३० वाजता खुले चर्चासत्र होणार आहे. चर्चासत्राचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार असून ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, केंद्रीय जी. एस. टी. उपआयुक्त अश्विनकुमार हुके, महाराष्ट्र राज्य जी. एस. टी. उपआयुक्त सचिन जोशी, सी. ए. सुनिल नागावकर मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती विद्यापीठ अर्थशास्त्र विभागातील आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, जी. एस. टी. म्हणजे काय हे सर्वसामान्य जनतेला समजण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन शाहू स्मारक भवनमध्ये केले आहे. यावेळी डॉ. विजय काकडे, डॉ. शिवाजी जाधव,केआयएचे मनीष झंवर, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

17 JUL 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आज जीएसटीवर चर्चासत्र

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स व कोल्हापूर इन्व्हेस्टर्स असोसिएशनतर्फे सोमवारी (ता. १७) 'जीएसटी व आपण' या विषयावर खुले चर्चासत्र होत आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवनमध्ये दुपारी साडेचार वाजता त्यास सुरवात होईल.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, ''जीएसटीमध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदी सर्वसामान्यांना कळाव्यात, हा चर्चासत्राचा उद्देश आहे. शहरी भागासह ग्रामीण भागातील लोकांत अद्याप जीएसटीबाबत संभ्रमावस्था आहे. ती दूर झाल्यास त्यातील फायदे त्यांना समजण्यास मदत होणार आहे.''

डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर, अश्विनकुमार हुके, उपायुक्त सचिन जोशी, सुनील नागावकर चर्चासत्रात मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2017
पुढारी

# विद्यापीठाच्या वतीने आज 'जीएसटी' विषयावर चर्चासत्र

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स व इन्व्हेस्टर्स असोसिएशन यांच्यावतीने सोमवारी (दि.१७) सायंकाळी ४.३० वाजता शाहू स्मारक भवन येथे 'जीएसटी व आपण' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन होणार आहे. अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, अश्विनकुमार हुके, जीएसटीचे उप-आयुक्त सचिन जोशी, चार्टर्ड अकौंटंट सुनील नागावकर मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2017
पुढारी

# 'संगणक अध्यापन आनंददायी'

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाचे ज्ञान प्राध्यापकच देऊ शकतात. याची सुरुवात शाळा, कॉलेजपासून सुरू व्हावी, यासाठी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम एक सामाजिक बांधिलकी म्हणून आयोजित केले जात असतात. संगणक अध्यापनाकडे विविध दृष्टिकोनातून पाहिल्यास अध्यापन आनंददायी होते, असा सूर मान्यवरांकडून व्यक्त करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभाग आणि क्विक हिल फौंडेशन यांच्या वतीने 'सी, सी प्लस प्लस : इंडस्ट्री परस्पेक्टिव्ह' या विषयावर विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत हा सूर व्यक्त झाला. यावेळी अजय शिर्के, संगणक विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. आर. मुधोळकर, क्विक हिलच्या सुगंधा दानी, प्रा. डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. के. एस. ओझा, डॉ. यू. आर. पोळ, प्रसन्न करमरकर, प्रसाद गोयल, कबीर खराडे, परशूराम वडर आदी उपस्थित होते.

17 JUL 2017 **Times of India** जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Take action to appoint gender champions in campus, UGC tells universities

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has asked universities and their affiliated colleges to take action on the implementation of gender champions in the campuses.

The UGC said gender champions promote equal rights and that colleges and universities should implement it in their campuses.

A Shivaji University official on UGC's latest move said, "An earlier letter from UGC had stated that they expect gender champions to strengthen the potential of young girls and boys to advocate gender equality and monitor progress towards gender justice. The commission intends to create a society that is gender sensitive and values girls and their rights. Now the UGC has included the third gender as well."

The UGC, in 2015, in order to achieve gender equality in educational institutions had instructed to appoint gender champions among students to foster equal treatment for both genders in a campus. However, back then there were no specific instructions about the third gender.

In an April 2016 letter from UGC secretary Jaspal Sandhu, all universities and colleges across the country, were instructed to involve the third gender in the scheme, which promotes active participation of students.

**Gender champions are in charge of identifying gender bias in classrooms, observe the reasons for gender inequality and suggest measures that would promote gender equality**

Earlier, the commission had asked colleges and universities to nominate a student as gender champion on campus. These students were to be in charge of identifying gender bias in classrooms, observe the reasons for gender inequality and suggest measures that would promote gender equality.

UGC had asked vice-chancellors to implement the guidelines for gender champions in the respective universities, as well as affiliated colleges in the interest of the students, so as to achieve long term sustainable change.

जनसंपर्क कक्ष
17 JUL 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीच्या वर्धापनदिन कार्यक्रमाचे उदुघाटन करताना प्र कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, एम. एल. चौगुले, प्राचार्य क्रांतीकुमार पाटील, डी. आर. मोरे, प्रा. डॉ. वासंती रासम, आर. एस. पाटील आदी.

# रवळनाथ सोसायटीचा वर्धापन दिन उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीच्या कोल्हापूर शाखेचा पाचवा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात झाला.

राजारामपुरीतील लकी बझारमधील सूर्या कॉन्फरन्स हॉलमध्ये वर्धापनदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के, ताराराणी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील, प्राचार्य डॉ.डी.आर.मोरे, प्रा. डॉ. वासंती रासम यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी दहावीच्या परीक्षेत यश मिळवलेल्या देवयानी आजगेकर, संस्कृती पोतदार, गौरी घुगरे यांचा प्र-कुलगुरु शिर्के यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तर नूतन संचालक प्रदीप अभ्यंकर आणि गडहिंग्लज शाखेचे सल्लागार महेश मजती यांचा शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्वागत कोल्हापूर शाखेचे चेअरमन प्रा.एस.आर. पाटील यांनी केले. प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष एम.एल. चौगुले यांनी केले. कोल्हापूर शाखेच्या सल्लागार वर्षा मैंदर्गी यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रा.डॉ. आण्णासाहेब कलगोंडा यांनी मानले.